पर्यावरण जनजागरण

भाग १

लेखक

चंद्रकांत शहासने

(देशभक्तकोशकार)

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या सौजन्याने

ही पुस्तिका कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या राष्ट्रभक्ती पर्यावरण आणि आरोग्य साक्षरता अभियानअंतर्गत प्रकाशित केली.

पुस्तकाचे नाव : पर्यावरण जनजागरण भाग१

लेखक : चंद्रकांत शहासने (देशभक्तकोशकार) पुणे
मो.क्र. – ९८८१३ ७३५८५

प्रकाशक : बहुजन साहित्यधारा, पुणे
११ ए, राहुल कॉम्प्लेक्स,
चौथा मजला, पौड रोड, पुणे.
दुरध्वनी : ९८८१३७३५८५
हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.

प्रकाशन दिनांक : २५ डिसेंबर २०२२ पहिली आवृत्ती

मुद्रक : श्री वेंकटेश पब्लिकेशन, पुणे
हिंगणे खुर्द, सिंहगड रोड. मो. क्र. ८२३७८ ९३३४७

पुस्तकाचे हक्क : ॲड. नंदिनी शहासने

ही पुस्तिका कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या राष्ट्रभक्ती पर्यावरण आणि आरोग्य साक्षरता अभियानअंतर्गत प्रकाशित केली.

मूल्य : रूपये ३०/–

संपर्क : श्री. हेमंत प्रभाकर आळवे, ठाणे
मो. : ९३२२२६९७२१
श्री. अशोक जनार्दन फडणीस, मेणोली–वाई
९८५०५ ०९४१६
श्री. भानुदास सोपान पायगुडे, धनकवडी–पुणे
९८५०३५१०३५

Or Pay to VPA

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणे या संस्थेस दिलेल्या देणग्या आयकर माफीस प्राप्त आहेत.
No.: THN/C.I.T.II/Tech/80G/104/2010-11/1479 Dt: 21/09/2010

पर्यावरण जनजागरण

ग्राम पर्यावरण

जनजागृती झालीयाविण! न संपेल गावाचे दैन्य! दृष्टी येता लोकांसि दुर्जन! मेखं घडवू न शकती !! या कार्यासी मिळावी जोड! म्हणुनी हाती घ्यावेत काही मुरदाड !! येणे शक्ती लाभे तोडीस तोड ! पडती फीके ग्रामशत्रु !!

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या ग्रामगीता या ग्रंथात सामाजिक पर्यावरण संतुलनाबाबत अनेक प्रकारचे इलाज मार्गदर्शनपर दिलेले आहेत. ते म्हणतात की गावामध्ये जनजागृती केल्याशिवाय गावाचे दारिद्र्य हटायचे नाही.

याठिकाणी त्यांनी दारिद्र्य म्हणजे बौद्धिक, मानसिक, आर्थिक या सर्वांचा समावेश केलेला आहे. गावातील प्रामाणिक व्यक्ती ग्राम सुधारणा व्हावी यासाठी प्रयत्न करत असतात. मात्र गावांतील दूर्जन आडबाजूला लपून चांगल्या गोष्टी घडून देत नाहीत. मात्र जनजागृतीमुळे आपले भले कशात आहे हे जेव्हा लोकांना समजते तेव्हा दुर्जन लोकांना समाज ओळखतो . मग गावामध्ये तंटा बखेडा अशांतता निर्माण करण्याचे त्यांचे उद्देश असफल होतात. यापुढे ते असे म्हणतात दुर्जनांचा नाश करण्यासाठी प्रसंगी गावातील आडदांड टग्यांनाही सोबत घ्यावे.

या ठिकाणी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची दूरदृष्टी दिसून येते. जनजागृती करताना गावातील अज्ञानी, अर्धवट, हेकेखोरांना देखील समुपदेशन करून त्यांना ग्राम सुधारणेच्या मोहिमेत सहभागी करून घ्यावे असे यातून ध्वनीत होते. आणि असे झाले की ग्रामशक्तीला खंबीर पाठिंबा मिळतो आणि ग्राम विकासाच्या आड येणारे पराभूत होतात.

आता गावाचा विकास म्हणजे तरी काय? गावामध्ये भरपूर झाडे असावीत.

रस्ते स्वच्छ असावेत. गटारे स्वच्छ असावीत. पाण्याची व्यवस्था शाळेची व्यवस्था, वाचनालये मैदाने, बाग-बगीचे, तलाव, विहिरी याने समृद्ध असेल ते आदर्श गाव. या गावातील माणसे देखील स्वच्छ विचाराची असावी लागतात तेव्हा गावाचा विकास होतो. अशाप्रकारे गावाचे पर्यावरण संतुलन झाले की गावात कधीही तंटा बखेडा होत नाही. गाव प्रगतीपथावर जाते. अशाप्रकारे सर्वच गावे प्रगतीपथावर गेली की तालुका आदर्श होतो. तालुका, जिल्हा व पुढे आपला देश प्रगतिपथावर जातो. हे सर्व केवळ गावातील पर्यावरणीय संतुलनाने साध्य होते.

वृक्ष आणि जीवसृष्टी यांचं घनिष्ट नातं आहे यातून सुधारणावादी मानवाने बोध घेऊन वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन आणि त्यातून पर्यावरणाचे रक्षण करणे ही राष्ट्रभक्ती आहे हे समजून आचरण करणे ही काळाची गरज आहे.

*****

मनाचे पर्यावरण

प्रभाते मनी राम चिंतीत जावा
पुढे वैखरी राम आधी वदावा
सदाचार हा थोर सांडो नये तो
जनी तोचि तो मानवी धन्य होतो !!

समर्थ रामदास स्वामींनी जगण्याची सात्विक जडणघडण कशी असावी याबाबत सुस्पष्टपणे केलेल्या रचनेतील वरील रचना ही स्वस्थ जीवनाची गुरुकिल्ली आहे.

यात समर्थ रामदास स्वामी म्हणतात की,
प्रभाते मनी राम चिंतीत जावा ....

म्हणजे केवळ सूर्योदय झाला, सकाळ झाली की रामनाम घ्यायला सुरुवात करा असा अर्थ कोणीही घेऊ नये.

यामध्ये सांगितलेले मनोविज्ञान असे आहे की प्रभाते म्हणजे ज्या वेळेला मनाची प्रभात होईल, सकाळ होईल, म्हणजे तुम्हाला ज्या वेळेला कुठला चांगला विचार सुचेल त्या वेळेला त्याचं चिंतन करा. त्याच्यावर विचार करा.

आणि पुढे वैखरी राम आधी वदावा! म्हणजे तो विचार वैखरी म्हणजे वाणी, म्हणजे बोलणे, म्हणजे बोलून दाखवा.

बोलून दाखवल्यानंतर .. तो आचरणात आणताना कोणताही वाईट हेतू मनात न ठेवता

सदाचार हा थोर सांडो नये तो.. म्हणजे तो विचार हा सामाजिक बांधिलकीतून समाजाच्या पुनरुत्थानाच्या उद्देशाने समाजाच्या भल्याच्या उद्देशाने मांडावा.

असे केल्याने तो विचार जगाला मान्य होतो म्हणजे..

जगी तोचि तो मानवी धन्य होतो ..

आपणास हे ज्ञात आहे की पर्यावरण म्हणजे मूळ स्वभावधर्म, गुणधर्मामध्ये बदल न करता खणखणीत आचार, विचार आणि प्रचार केला तर कोणीही दुः खी होत नाही. त्यापासून समाजाची हानी होत नाही यालाच पर्यावरण रक्षण असे म्हणायचे.

वृक्ष आणि जीवसृष्टी यांचं घनिष्ट नातं आहे यातून सुधारणावादी मानवाने बोध घेऊन वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन आणि त्यातून पर्यावरणाचे रक्षण करणे ही राष्ट्रभक्ती आहे हे समजून आचरण करणे ही काळाची गरज आहे.

*****

पर्यावरण रक्षणासाठी पर्यावरणाचा ध्यास

आइका सुर्याचिया प्रकाशा।
हेतू कारण सूर्यचि जैसा।
का उसाचे कांडे उसा ।वाढी हेतु।।१८/३६३
नाना वाग्देवता वानावी। तै वाचाचि लागे कामवावी।
कां वेदां वेदेचि बोलावी। प्रतिष्ठा जे।।१८/३६४

पर्यावरणाच्या रक्षणासाठी काय करावे याबाबत अनेकदा अनेक चर्चासत्रे होत असतात. यामध्ये अनेक उपाय सुचवले जातात. पण जेव्हा आपण आध्यात्मिक परिभाषेत विचार करतो, पर्यावरण रक्षणाबाबत विचार करू लागतो तेव्हा ज्ञानेश्वरीमध्ये माऊलीने जे तत्व सांगितलेले आहे ते तत्त्व म्हणजे...जे काम करायचे आहे ते त्याच गुणधर्मातून त्याच मूल तत्त्वातून करावे. जे करायचे आहे त्याचा निजध्यास त्याच धारणेतून करावा .

आपल्याला सुर्याचा प्रकाश पाहिजे असेल तर आपण सुर्याचा ध्यास अथवा सूर्याची संगत करायला हवी. जर आपल्याला ऊस पाहिजे असेल शेतामध्ये ऊसच लावायला पाहिजे. आपल्याला एखाद्या विषयाची स्तुती करावयाची असेल तर त्यासाठी वाणीचाच वापर करायला हवा. तेव्हाच त्या कृतीला प्रतिष्ठा मिळेल. म्हणजे ती कृती सर्वबाजूंनी व्यवस्थित निर्दोष अशी होईल. म्हणजे जर आपल्याला सद्य:स्थितीत बदललेले पर्यावरण पुन्हा संतुलित करायचे असेल तर कणांकणांत जी दूषित कृती झालेली आहे, जे पर्यावरण नासले आहे ते समजून घेण्याचा निजध्यास मुळापासून धरणे क्रमप्राप्तच आहे. अशाने पर्यावरण हे सुदृढ होईल, हे लक्षात घेऊन तसे प्रयत्न करायला हवेत. निजध्यास धरायला हवा.

माऊली सांगते की ''नामसंकीर्तन साधन पै सोपे'' म्हणजे जे करायचे आहे

त्याचे स्मरण करा. आपल्याला यश नक्कीच येणार. म्हणून पर्यावरणपूरक काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्यांने पदोपदी प्रत्येक कृतीतून पर्यावरण पोषक अशाच कृती करायला हव्यात.

वृक्ष आणि जीवसृष्टी यांचं घनिष्ट नातं आहे यातून सुधारणावादी मानवाने बोध घेऊन वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन आणि त्यातून पर्यावरणाचे रक्षण करणे ही राष्ट्रभक्ती आहे हे समजून आचरण करणे ही काळाची गरज आहे.

*****

ठेविले अनंते तैसेची रहावे! चित्ती असू द्यावे समाधान !!

जगद्गुरु तुकाराम महाराजांनी आपल्या वरील अभंगातून पर्यावरण रक्षणाचा फार मोठा उपदेश केलेला आहे.

मात्र सद्याच्या तथाकथित बुद्धिजीवी मंडळींनी पर्यावरण कसे नासविले जाईल यासाठीच या रचनेला बदनाम केलेले आहे की काय असेच वाटते.

तुकाराम महाराजांच्या अभंगाचा अर्थ काहीजण

''असेल माझा हरी! तर देईल खाटल्यावरी !!''

असा सर्वस्वी चुकीचा लावतात. माणसाला आळशी बनवण्यासाठी अभंगाचा असा चुकीचा अर्थ काढला जातो.

चंगळवाद, स्वैराचार आणि स्वार्थ सांभाळण्यासाठी सुधारणेच्या नावाने

प्रदूषणाचे साम्राज्य वाढवीत आजवर आपण स्वतःला पुढारलेले समजून घेण्यात धन्यता मानत आहोत.

पण आता सुधारणे हे आवश्यक झालेले आहे.कारण भरभरून देणारा निसर्ग आपल्याला प्राणवायूसाठी पैसे मोजायला लावत आहे.

तुकाराम महाराज या अभंगातून असे सांगतात की परमेश्वराने आपल्याला जे जन्मजात ऐश्वर्य, आरोग्य दिलेले आहे ते तसेच रहावे .

म्हणजे कसे ?

अनंते म्हणजे परमेश्वराने मला हात, पाय आदी पंचज्ञानेंद्रीये, पंचकर्मेंद्रिये दिलेली आहेत. निसर्गसंपत्ती, शरीरसंपदा,खनिजसंपत्ती,जलसंपत्ती, परंपरा, मातृपितृछत्र असे खूप काही दिलेले आहे. ते सारे अबाधित रहावे. हे केवळ अबाधित राहावे. तैसेची रहावे.

यापुढे महाराज म्हणतात की त्यातून समाधान मिळावे. चित्ताचे समाधान म्हणजे आनंद. माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. त्यामुळे त्याचेआई-बाप, बंधू-भगिनीं, आप्तस्वकीय, नातेवाईक , गावकरी, देशातील लोक हे सर्व आनंदित राहून त्यातून प्रगती करणे म्हणजे समाधान.

घरामध्ये भरपूर संपत्ती येत आहे आहे आणि आपलाच एक बंधू दारू पिऊन गावभर धिंगाणा घालतोय, शिवीगाळी करतोय, बायकोला हाणामारी करतोय नि समाज त्याची अवहेलना करतोय. असे चित्र जर घरात असेल तर तिथे आनंद, समाधान असेल काय?

यासाठी समाज निर्व्यसनीअसावा. संपत्ती मिळवीत असताना त्यातून समाजकल्याण होत नसेल, समाधान प्राप्त होत नसेल तर ती संपत्ती कूचकामी ठरते. ती माणसाला विनाशकारी बनविते.

यासाठी प्रगती करीत असताना सर्वसमावेशक कल्याण जोपासत राहणे यास जगतगुरु तुकाराम महाराज समाधान असे म्हणतात.

आता समाधान याचा अर्थ समजून घेताना दुसऱ्याचा मत्सर नको. दुसऱ्याला त्रास नको. दुसऱ्याला ओरडणे दुःख देणे, लूबाडून खाणे असं काही होऊ नये. आपल्याला जे मिळते ते दुसऱ्याला देखील मिळायला हवे. तुकाराम महाराजांच्या शिकवणीनुसार सुखी जीवनाचा मार्ग म्हणजे केवळ समाधान होय.

मात्र आपण हा नियम पाळत नाही. कधीही उठतो, कधीही जेवतो, कधीही झोपतो. निसर्ग नियम तोडतो. अगदी सहजतेने कोणताही विचार न करता प्रदूषण करतो, नद्यां नासवतो, घरबांधणीसाठी झाडे तोडतो,नि घरामध्ये जागोजागी वातानुकुलित यंत्रणा बसवून वायू प्रदूषण करीत तापमान वाढवतो, गाड्यांचा धूर, प्लास्टिकचा कचरा करतो. अगदी बिनदिक्कतपणे निसर्ग नियम पायदळी तुडवतो. क्षणिक सुखासाठी आणि बडेजाव मिळवण्यासाठी आपली सगळी धडपड असते. मात्र हे सर्व करत असताना आपणच आपले दीर्घकालीन नुकसान करून घेत असतो. त्यामुळे निसर्ग आपल्याला साहाय्य करत नाही आणि आपले आरोग्य बिघडते.

पर्यावरणाचे देखील असेच आहे.

विश्वाची रचना म्हणजे ठेविले अनंते! परमेश्वराने जसे ठेवले असेल त्यात काहीही बदल करू नये. म्हणजे तैसेची रहावे आणि सदैव समाधानी जगावे म्हणजे चित्ती असू द्यावे समाधान!

अत्यंत हव्यासापोटी आपण हे संतुलन बिघडवतो आहोत नि स्वतःला विनाशाकडे घेऊन जात आहोत.

वृक्ष आणि जीवसृष्टी यांचं घनिष्ट नातं आहे. यातून सुधारणावादी मानवाने बोध घेऊन वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन आणि त्यातून पर्यावरणाचे रक्षण करणे ही राष्ट्रभक्ती आहे हे समजून आचरण करणे ही काळाची गरज आहे.

*****

पर्यावरणाच्या ऱ्हासाची कारणे

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेतून पर्यावरणाच्या ऱ्हासाची स्थिती का आणि कशी आली यांचे निवेदन केलेले आहे.

यासी सर्वची असती जबाबदार।
शक्ति, संपत्ती, विचार, प्रचार ।
हे एकहि नाही ताळ्यावर।
म्हणोनि ग्राम ओसाडले।।

श्रीमंता आपुलें न वाटे काम।
गरीबा उत्पादनाचे नाही प्रेम।
शिक्षिता हीन वाटतो परिश्रम।
यानेच आली शिथिलता ।।

अत्यंत सोप्या, साध्या मराठी भाषेमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सांगतात...

एकीकडे आपण म्हणतो की बेकारी वाढलेली आहे पण दुसरीकडे पाहिलं तर देशात कामाचा डोंगर उभा आहे, दारिद्र्य आणि दुःखाचा महापूर आहे, अर्धनग्न, अर्धपोटी लोक अपार आहेत. मात्र त्यांचे दुःख आपल्याला का दिसत नाही. अशावेळी विश्रांती घ्यायला वेळ आहे का? यासाठी निरंतर आणि प्रबळ इच्छाशक्तीचे कार्यकर्ते जर पुढे आले तर बेकारी कशासाठी राहील.

तर ज्यांना केवळ साहेबगिरी करायची आहे आणि लोकांवर रुबाब चालवायचा आहे, कष्ट न करता फक्त आराम करायचा आहे तेच लोक बेकार

राहतात.

शिक्षण घेणारे श्रीमंत आणि मजुरी करणारे गरीब यांच्यामध्ये आळस आणि उदासीनता घरोघरी संसार थाटून बसलेली आहे. जोपर्यंत भूक लागत नाही तोपर्यंत घरी आळशी होऊन पडायचे हा रोग सगळीकडेच ठाण मांडून बसलेला आहे. कामासाठी कष्ट करायचे नाहीत आणि फक्त तोंडाने वाचाळपणा करायचा आणि जनतेमध्ये गोंगाट भरायचा हे सगळे चुकीचे कामचुकारपणाचे उद्योग जेव्हा समाजामध्ये वाढतात तेव्हा समाजाचे आर्थिक सामाजिक आणि पर्यावरणीय संतुलन बिघडत जाते. श्रीमंतांना वाटते मी कशाला काम करू आणि गरीब म्हणतो कष्ट करून मी मालकाला श्रीमंत कशाला करू? कष्टाची कामे करणे शिकलेल्यांच्या मनाला पटत नाही आणि यामुळे सर्वत्र उदासीनता, शिथिलता पसरते. याचा परिणाम म्हणजे सामाजिक समतोल बिघडतो. आज परिस्थिती अशीच आहे. स्वार्थासाठी ज्याला जे पाहिजे ते जो तो निसर्गापासून ओरबडतो आहे. कारखानदार आपल्या कारखान्यातील दूषित वायू, दूषित पाणी आणि दूषित दुषित वस्तू उघड्यावर कुठेही फेकून देतात आणि वातावरण दूषित करून टाकतात. ज्यामुळे पाणीदेखील दूषित झालेले आहे. मद्यालयांचे पेव फुटले असून पाणवठे आटले आहेत.व्यसनांना प्रतिष्ठा मिळाली आणि उपासनेला तिरस्कार मिळतो आहे. अतोनात वृक्षतोड नियोजनशून्य कामे आणि सामाजिक बांधिलकीचा अभाव यामुळे पर्यावरण रक्षण कसे करायचे हीच मोठी समस्या होऊन बसली आहे. परिणामी निसर्गाने विनामूल्य दिलेली शुद्ध हवा, शुद्ध पाणी यासाठी अतोनात आर्थिक बोजा समाजावर पडत आहे.

वृक्ष आणि जीवसृष्टी यांचं घनिष्ट नातं आहे. यातून सुधारणावादी मानवाने बोध घेऊन वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन आणि त्यातून पर्यावरणाचे रक्षण करणे ही राष्ट्रभक्ती आहे हे समजून आचरण करणे ही काळाची गरज आहे.

*****

।। पर्यावरण स्तोत्र ।।

रचनाकार : चंद्रकांत शहासने.

।। श्री गणेशाय नमः ।।
अनंत कोटी ब्रम्हांडनायक।
परब्रह्मम्हणती तयास।
जयाने निर्मिले ब्रह्मास ।
परब्रम्ह रचावया ।। १ ।।
ऐशा ब्रह्मांडाचा जो पसारा।
त्यात सूर्यादिक ताऱ्यांचा घेरा ।
नवग्रह आणि आकाशगंगा ।
परब्रह्मे रचियेली ।। २ ।।
जयाने रचिले नभोमंडळ।
आणिक मानवी जीवन।
प्राणी पक्षी वृक्ष अनेक।
विविध उपयोगाचे ।। ३ ।।
ज्यांची काय वर्णावी महती।
निर्झरासम पवित्र ती मती ।
तयांचे कर्तृत्व वृक्षवल्ली ।
शोभती जणू सगेसोयरे ।। ४ ।।
ऐशा सूर्यमालिकेतील एक।
आपले ब्रह्मांड म्हणती तयास।
तेथं येऊन जन्मास।
देह झिजविले अनेकांनी ।। ५ ।।
ऋषी तपी आणिक संत।
कणाद,भृगू,विश्वामित्र ।
दालभ्य, आर्यभट्ट, श्रीहरी ।



किती एक ते वर्णावे ।। ६ ।।
तयांनी निर्मिले अनेकानेक ग्रंथ।
स्वकर्मे आचरोनी समस्त।
सत्य सांगे उपनिषद ।
अध्यात्म सोपान मोक्षाचा ।। ७ ।।
कलियुगी मोक्षासी कारण।
केवळ आहे पर्यावरण ।
तयास टाळता बंधन ।
चराचरा होतसे ।। ८ ।।
मोक्षास जे कारण।
पर्यावरण म्हणती तयास।
नभो मंडळाचे आवरण।
सर्वांसी पोषक ते ।। ९ ।।
पर्यावरण मनाचे ।
पर्यावरण जनाचे।
पर्यावरण नभोमंडळाचे।
मन आरोग्याची उपकारी ।। १० ।।

पर्यावरण म्हणजे आवरणं ।
पृथ्वी सभोवती पांघरूणं।।
उब माया आणिक ज्ञान ।
आरोग्य शांती देतसे ।। ११ ।।
ऐशा या पर्यावरणास ।
संभवतो धोका खास ।
विकृत सत्तांधांचा अट्टाहास ।
पर्यावरणा बिघडवितसे ।। १२ ।।
स्वार्थापोटी रसायन निर्मिती।
दूषिते सोडी जलाप्रती।
जलचर, मासळी आणि प्राणी।
तडफडून मरतसे ।। १३ ।।
दूषित जलाने ना पिके शेती।
वृक्ष फळे ग्रासती ।।
फुले पाने झडतसी।
पक्षीही ना बांधती घरकुले ।। १४ ।।
रसायने आणि यंत्रे।
प्रसविती वायू प्रदूषणे ।।
पांढरेफटक जाहले चेहरे।
जिवंतपणी मानवाचे ।। १५ ।।
रोगराईचे प्राबल्य।
दमा,क्षय आणि ज्वर ।
तरुणपणी मानवजात ।
वृद्धापकाळ भोगतसे ।। १६ ।।
कारखान्यातील दूषित कण।
भेदिती तारांगण ।
आपसुके पडणारा पाऊस ।
दूषितही जाहला ।। १७ ।।
हे केवळ एक प्रदूषण।
कारखानदारी कारण जयास।
तथापि आणखी अनेक ।
प्रदूषणे मानवी निर्मिली ।। १८ ।।
त्यातील पहिले मनाचे।
मूळ विकार वासनेचे ।।
स्वैराचार, स्वार्थांध लालसेचे ।
कर्म काय वर्णावे ।। १९ ।।
दिवसाढवळ्या आक्रमती।
कित्येकांस ठार मारती ।
संपत्ती स्त्रिया आणि संस्कृती।
दांडगाईने मारतसे ।। २० ।।
पर्यावरणा नासवती जन ।
प्रतिष्ठोनी आपले स्वैराचरण।
विचार, आचार आणि विवेक।
स्वैराचारे नासविती ।। २१ ।।
पर्यावरणा नासविती सत्तांध ।
गुलाम करोनि जनांस ।
इंग्रजे निर्मिले कारकुनांस ।
तैसेचि नीति आचरती ।। २२ ।।
पर्यावरणा नासविती मदांध।
जुलमानी छळती प्रजेस।
कित्येक वंशलतेच्या उच्छेदास ।
मारक जैसे जाहले ।। २३ ।।
पर्यावरणा नासविती सुंदरा।
देह प्रदर्शनाचा सोहळा।

अर्थ आणि प्रतिष्ठा।
मिळविती जे कामांध ।। २४ ।।
पर्यावरणा नासवती जे धर्माचे ।
पर्यावरणा नासवती जे संस्कृतीचे।
तयाकारणे प्रसिद्धी माध्यमे ।
हमखास चढाओढी करताती ।। २५ ।।
रिमोट टीव्ही माध्यमे ।
पर्यावरणाचे निसविती चाळे।।
घरी बसल्या अवलोकावे ।
आपुल्याची दुर्दैवा ।। २६ ।।
ऐशा या प्रदूषणा ।
काय उपाय तो जाणा ।
परब्रह्माच्या मूळरुपा ।
तुम्ही-आम्ही विनवावे ।। २७ ।।
तेव्हा आता उपाय जाणा।
वाचविण्यास पर्यावरणा ।
आपली संस्कृती आपण जाणा।
जाणावे उपनिषदात ।। २८ ।।
जे जे पर्यावरणाचे कामी ।
अट्टाहासे कर्मे आचरती ।
तयांचे प्रती सामर्थ्य जोडोनी।
आपणही करावा अट्टहास ।। २९ ।।
ऐसी जयाची कुल करणी ।
दिलीप होऊनी जे आचरणी।
पर्यावरण ध्यानी मनी ।
ठेऊनिया आचरती ।। ३० ।।
तयांचे करोनी कौतुक ।
आपुले बलं अर्पुनी तयांस ।
जे जे उचित नि आवश्यक ।
साह्य हमखास करावे ।। ३१ ।।
ऐसे केलीयाचे फळ ।
रक्षिले जाईल पर्यावरण।
वृक्षवल्ली-फळे फुलांस।
बिलगतील पक्षी ही ।। ३२ ।।
रक्षिली जाईल संस्कृती।
खनिज आणि जलसंपत्ती ।
नभो मंडळाची व्याप्ती ।
निरोगी होईल हमखासं ।। ३३ ।।
पर्यावरण रक्षणास ।
होऊ या आता कटिबद्ध ।
नवीन सहस्त्रकास अभिवादन ।
करू या पर्यावरण नामे ।। ३४ ।।
इति श्री चंद्रकांत शहासने रचित
पर्यावरण विवरण स्तोत्रम् संपूर्णं।

****

आरती जय गोमाता

(चाल : आरती ज्ञानराजा)

आरती जय गोमाता
तुझे चरणावरी माथा
अनंत उपकार
कैसे सांग फेडू आता....१
आरती जय गोमाता....

साधू संत तुज पुजिती,
तूच वंदनीय माय!
दुःख आणि दारिद्र्यही,
तुझ्या दर्शनाने जाय २

शेतीसाठी बैल राबतो
सर्वा आनंदही देतो,
धनधान्य पिकवितो
सुख समृद्धीचा दाता...३

शेण गोमूत्र प्राशिता,
आरोग्य पर्यावरण
तुझ्याजवळी रहाता...४

दत्तापाशी तुझी छाया
आम्हा सर्वावरी माया,
दूध तूप पक्कान्नाने
सारी उजळते काया...५

संस्कृती आरोग्याचा
स्त्रोत तुझ्या प्रांगणात,
सान थोरा आता दे दे
पोटभर आशीर्वाद ६

रचनाकार :
चंद्रकांत शहासने.
(देशभक्तकोशकार)
मोबाईल : ९८८१३७३५८५

विचार करा... चिंतन करा...

स्वातंत्र्य, स्वाभिमान, स्वराज्य, स्वत्व, स्वैराचार, स्वार्थ

वरील शब्द विस्ताराने लक्षात घेतले व त्याबाबत आत्मचिंतन केले की आपल्याला हे लक्षात येते की यामध्ये स्व म्हणजे मी स्वतः कुठेतरी आहे व मी करत असलेल्या कृती ह्या माझ्या कुवतीप्रमाणे माझ्यासाठी, माझ्या तत्त्वानुसार होत असतात. आता आपण करत असलेल्या कृती या आपल्याला स्वतःला जरी योग्य वाटत असल्या तरी समाज त्याकडे कसे पाहतो यावरून आपल्या कर्माची व्याप्ती ठरते. एखादी व्यक्ती आपल्याच घराच्या गच्चीवर बसून जोराने आवाज चढवून नाचत गाणी गात असेल तर ते गाणे त्याच्या स्वतःसाठी आनंददायी जरी असले तरी शेजाऱ्यांना ते त्रासदायक वाटते. अशा वेळेला आपण म्हणतो की तो माणूस स्वार्थी आहे, स्वैराचारी आहे. उपद्रवी आहे. माझे संस्कार आणि त्यानुसार कर्म करणे हा माझा स्वाभिमानाचा विषय असला तरी इतर मंडळी मला म्हणतात की जगाप्रमाणे वागायला शिका. हा तुमचा स्वाभिमान नाही तर अहंकार आहे. म्हणजे माझा स्वाभिमान हा त्यांना अहंकार वाटतो. माझे स्वातंत्र्य त्यांना स्वैराचार वाटतो. विचार करा... चिंतन करा..

लेखक : चंद्रकांत शहासने (देशभक्तकोशकार)
९८८१२७३५८५